**प्रेसनोट** **दि.३०/०३/२०१९**

**येरवडा पोलीस स्टेशन,पुणे शहर**

**कम्युनिटी पोलिसींग संकल्पने हद्दीतील महाराष्ट्र हौसिंग बोर्ड येथील महादत्त रिक्षा स्टँड व प्रेरणा जेष्ठ नागरिक मंच येथे भेट देऊन त्यांच्या अडीअडचणी जाणून घेऊन पोलीस आयुक्तालयामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनांची माहिती दिले बाबत.**

---

येरवडा पो.स्टे.कडील पोलीस उप निरी.श्री. विठ्ठल माने व पो.शि. ८४२५ राजेंद्र ढोले यांनी मा.पोलीस आयुक्त सो. पुणे शहर यांचे कम्युनिटी पोलिसींग या संकल्पने अंतर्गत दिनांक २९/०३/२०१९ रोजी १९:०० ते २०:१५ वा.चे दरम्यान येरवडा पो.स्टे.चे कार्यक्षेत्रातील महादत्त रिक्षा स्टँड व प्रेरणा जेष्ठ नागरिक मंच, महाराष्ट्र हौसिंग बोर्ड, येरवडा, पुणे येथे भेट देऊन, रिक्षा चालक व जेष्ठ नागरिकांची बैठक घेतली.

उपस्थित रिक्षा चालक व जेष्ठ नागरिकांशी सुसंवाद साधून, त्यांच्या अडीअडचणी व सूचना जाणून घेतल्या. त्यांना पोलीस आयुक्तालयामध्ये महिला, बालके व जेष्ठ नागरिकांचे सुरक्षा तसेच तक्रारींचे निराकरण करण्यासाठी नव्याने स्थापन करण्यात आलेल्या ‘भरोसा सेल’ याची माहिती, संपर्क क्रमांक देण्यात आले. तसेच सर्व रिक्षा चालक व जेष्ठ नागरिक यांना मा.पोलीस आयुक्त कार्यालयामार्फत पुणे शहरात नागरिकांचे सुरक्षेसाठी राबविण्यात येणारे एकूण १४ विविध योजनांबाबत माहिती देण्यात आली आहे. तसेच त्यांना येरवडा पोलीस स्टेशन कडील व्हॉटस्ॲप नंबर देण्यात आला. त्यांना आढळून येणाऱ्या बेकायदेशी गोष्टींची माहिती पोलीसांना देण्याबाबत आवाहन करण्यात आले. तसेच त्यांचा व्हॉटस्ॲप ग्रुप तयार करण्यात आला आहे.

अशा प्रकारे येरवडा पो.स्टे.चे पो.उप.निरी.श्री. विठ्ठल माने व पो.शि. ८४२५ राजेंद्र ढोले यांनी चांगली कामगिरी केली आहे.




**( राजेंद्र कदम )**
वरिष्ठ पोलीस निरीक्षक,
येरवडा पोलीस स्टेशन, पुणे



